MAHBIL03429/13/1/2000-TC    खाजगी वितरणासाठी    वर्ष: दहावे । अंक बारावा । एप्रिल, २०११

# CIDCO Nirmiti

A NEWSLETTER

'निर्मिती' www.cidcoindia.com या संकेतस्थळावरही उपलब्ध



01 CIDCO conducts special workshop to expedite the NMIA Project


03 सिडकोचा ४१वा वर्धापन दिन उत्साहात साजरा


04 सिडको महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांनी साजरा केला १०० वा जागतिक महिला दिन सिंधुताई सपकाळ यांची उपस्थिती


06 पनवेल रेल्वे स्थानकासमोरील अरुणोदय चौकाचे उद्घाटन


# CIDCO conducts special workshop to expedite the NMIA Project



To discuss the learnings from various airport projects commissioned in the country under PPP structure and the way forward for the development of the prestigious Navi Mumbai International Airport (NMIA) project, a one-day workshop was organised by CIDCO for the senior officials of State Govt. officials, consultants and senior officials of CIDCO. The objective of the workshop was the deliberation on the formalization of legal and bidding parameters for NMIA.

The workshop was organised by CIDCO, in association with M/s Hemant Sahai & Associates on **10th March, 2011 at Vivanta By Taj, President Mumbai** to expedite the bidding process of the Airport.

In the introductory remark, **Mr. T. C. Benjamin,** IAS, Principal Secretary, Urban Development, GoM, made a key note, where he briefed about the NMIA project, the activities undertaken and its current status. **Mr. Tanaji Satre,** VC & MD, CIDCO, also shared his views on the subject and briefed about the workshop to the participants. The workshop was attended by **Mr. U.P.S. Madan,** Project Manager, Mumbai Transformation Support Unit, All India Institute of Local Self Government, GoM, **Mr. Javed Ahmad,** Commissioner of Police, Navi Mumbai, **Mr. Suresh Kakani,** Dy. Secretary, UD (I), GoM, **Mr. Purushottam Karad,** DCP, HQ, Navi Mumbai, **Mr. G. Ubilla,** Prime Consultant, LBG, **Mr. V. K. Kalra,** Advisor, Airport, and senior officials of CIDCO.

Initially, **Mr. Soma Vijaykumar,** ACTE, CIDCO, made a brief presentation on Navi Mumbai International Airport, in which he covered the information about approvals from GoI and GoM, project brief, site orientation, master plan – NMIA, project activities – status and project schedule.

**Mr. Stephen Beatty** – Global Head of Aviation, KPMG, presented international case studies wherein he briefed about transaction structure, ownership structure, traffic assignment, regulatory framework, operating challenges, and financing challenges. He also shed light on case studies of multi-airport cities such as New York; London; Sydney; Paris; Bangkok; Chicago; San Francisco; Sao Paulo; Buenos Aires and Madrid. Mr. Beatty also presented an analysis of risk framework in multi-airport-single-operator and multi-airport-multi operator environments.









**Mr. Amber Dubey,** Director, KPMG, made a presentation on Concession Risk Framework in Greenfield and Brownfield Airport projects in India wherein he covered issues like project risk environment in monopolistic and competing airports – traffic; financing; regulatory and others, comparison with international case studies, discussion on key clauses of the Concession Agreement for Greenfield and Brownfield Concessions, and AERA's current view on form and approach to regulation.

In the post-lunch session, **Mr. Hemant Sahai, Mr. Manish Agrawal** and **Dr. Vasudevan,** exchanged their views on the bid process followed for Delhi, Mumbai, Hyderabad and Bengaluru Airports, in which they shared their experience about bidding process, where the major emphasis was on issues and challenges in bid process, key learnings for CIDCO and State Govt. In the last session, the experts from M/s Hemant Sahai & Associates and KPMG provided information on the consideration for successful development of Navi Mumbai Airport wherein topics like traffic distribution – should this be a pre-requisite? – implications on project investment and phasing, preferred transaction structure: preferred bidding parameter – implications of MIAL's ROFR on choice of bid parameter and development plan for NMIA Project, addressing regulatory risks: determination of Regulated Asset Base; determination of Aero Tariffs; Single Till vs Dual Till vs Hybrid Till – implications on project structuring; determination of cost of capital (WACC); treatment of O&M expenditure; treatment of revenue from commercial assets; provisions for levy of ADF and UDF and treatment of such revenues, compensation provisions; considerations for attracting international interest – likely expectations of foreign bidders, role of CIDCO, State Government, GoI in mitigating development risk – for e.g. financing connectivity infrastructure.









The whole workshop during the day saw a lot of exchange of information, brainstorming sessions and purposeful discussions on varied topics, where the consultants satisfactorily explained the concerns raised by the participants.





The workshop would play a definitive role in the preparation of a comprehensive bidding document to make the project financially viable to the bidders, money lenders, airlines and other concerned parties and help them in making a smooth transaction and timely completion of the project.

Following officers from CIDCO also participated in the workshop: **Mr. M. D. Lele, Mr. A. S. Patil, Mr. A. M. Agrawal, Mr. Kamlakar Phand, Mr. B. B. Mehta, Mr. J. R. Kulkarni, Mr. Satyendu Sinha, Mr. A. R. Jadhav, Mr. Ravikumar KVRK, Dr. D. U. Watane, Dr. Mohan Ninawe, Mrs. Geeta Pillai, Mr. Arun Deshmukh, Mr. K. T. Magare, Mr. S. A. Nadgauda, Mr. M. G. Beig, Mr. Salve, Mr. M. Mahadev, Mr. P. V. Ohale,** and **Mrs. V. Hema Latha.**













# सिडकोचा ४१वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**१७ मार्च - सिडकोचा स्थापना दिवस.** २०११ मध्ये सिडकोने ४१ वर्षांची आपली प्रगतीशील कारकीर्द पूर्ण केली. या वर्धापन दिनाचे औचित्य साधून सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्साहात आनंदोत्सव साजरा केला. सिडको भवनच्या ७व्या मजल्यावरील सभागृहात या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. परस्परांना शुभेच्छा, भूतकाळातील कडू-गोड आठवणींची देवाण-घेवाण, केकची मधुर चव आणि सिडकोतील कलावंतांनी गुंफलेली संगीत मंजुषा अशा हृद्य घडामोडींनी बहरलेला असा हा अविस्मरणीय सोहळा होता.










याप्रसंगी वर्धापन दिनाच्या शुभेच्छा देताना व्यवस्थापकीय संचालक श्री. तानाजी सत्रे म्हणाले की, '१९७० साली सिडकोच्या निर्मितीकरिता पुढाकार घेणाऱ्या राज्यकर्त्यांचे सर्वप्रथम आभार मानले पाहिजे, कारण त्यांनी जन्म दिला नसता, तर राज्यातील विविध नवीन शहरांच्या प्रकल्पांची निर्मितीही नियोजनबद्ध आणि भावी गरजांना अग्रक्रम देऊन झाली नसती. नवी मुंबईने अनेक महत्त्वाकांक्षी आंतरराष्ट्रीय दर्जांच्या प्रकल्पांना आपल्या नियोजनात स्थान दिले आणि देशाच्या आर्थिक राजधानीचे जुळे शहर आज एक स्वयंपूर्ण शहर म्हणून नावलौकीक मिळवून आहे. आता भविष्याकडे अधिक चोखंदळपणे पाहिले पाहिजे लवकरच हाती असलेले प्रकल्प पूर्ण होतील' आणि म्हणून आपल्या कक्षा रुंदावण्याकरिता आणि आर्थिक सक्षमता कायम ठेवण्याकरिता अधिक जोमाने कार्यरत होण्यासाठी पुढाकार घेण्याची गरजही त्यांनी यावेळी बोलून दाखवली.



या प्रसंगी सिडको कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष **श्री. निलेश तांडेल** म्हणाले की, 'माणसाचं वय वाढलं की आयुष्य कमी होतं, मात्र सिडकोच्या बाबतीत दिवसागणिक सिडकोची प्रगल्भता, उन्नती, कार्यविस्तार व प्रवास वाढतच आहे', त्यांनी वर्धापन दिनाच्या शुभेच्छाही मनोगतात दिल्या.

तसेच सरचिटणीस **श्री. मिलिंद बागुल** आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, सिडको महामंडळाने महाराष्ट्रातच नव्हे, तर महाराष्ट्राच्या सीमेपलीकडे भरारी घेऊन आपल्या कार्यकक्षा वाढविल्या असून, सिडकोतील अधिकारी व कर्मचारी कार्यक्षम व निष्णात असल्यामुळेच सिडको महामंडळ नावलौकिकास आले आहे' असे सांगून वर्धापनदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

या सोहळ्याला उपस्थित **श्री. ए. एस. पाटील, श्रीमती रीमा दीक्षित, श्री. महादेव बुवा शाहबाजकर, श्रीमती अनुपमा कर्नम, श्री. आर. जी. मोरे** यांनीही आपले अनुभव व्यक्त केले. या प्रसंगी सिडकोचे मुख्य आरोग्य अधिकारी **डॉ. बावस्कर,** व्यवस्थापक कार्मिक **श्री. एस. एस. नाईक,** सिडको ओबीसी कर्मचारी वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष **श्री. बी. आर. तांडेल** आणि सिडको आर्टिस्ट कंबाईनचे अध्यक्ष **श्री. ज्ञानेश्वर भोईर** प्रामुख्याने उपस्थित होते.

मुख्य सोहळ्यापूर्वी सिडको आर्टिस्ट कंबाईनच्या कलावंतांनी हिंदी मराठी गीतांचा नजराणा पेश केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जनसंपर्क अधिकारी **डॉ. मोहन निनावे** यांनी केले. सदर कार्यक्रमप्रसंगी सिडकोतील विविध विभागांचे विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.









# सिडको महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांनी साजरा केला १०० वा जागतिक महिला दिन

## सिंधुताई सपकाळ यांची प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थिती

'अंधार झाल्याशिवाय पहाट उगवतच नसते म्हणून प्रत्येकाच्या आयुष्यात एक अंधार येत असतो, एक अंधारी रात्र येते त्याचं नाव, संकट असतं, जर तुमच्यावर संकट कोसळलं तर त्यावर पाय देऊन उभे रहा. संकटाची उंची तुमच्यापेक्षा कमी होईल म्हणून संकटाला घाबरू नका, त्यावर स्वार व्हायला शिका आणि लक्षात ठेवा संकट त्याच्यावरच येतात जो सहन करू शकतो', असा भावपूर्ण संदेश सिंधुताई सपकाळ यांनी उपस्थितांना दिला.



सिडकोच्या वतीने सिडको भवनातील सातव्या मजल्यावरील सभागृहात शंभराव्या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला सिडकोचे अध्यक्ष **मा. श्री. नकुल पाटील, श्रीमती पुष्पलता पाटील, श्रीमती अनुराधा सत्रे,** सिडको कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष **मा. श्री. निलेश तांडेल,** सरचिटणीस **मा. श्री. मिलिंद बागूल,** मुख्य सामाजिक सेवा अधिकारी **श्रीमती रीमा दीक्षित** तसेच वरिष्ठ संख्यातज्ज्ञ **श्रीमती रीटा अब्बी** प्रामुख्याने उपस्थित होते.

आपल्या भाषणात त्यांनी श्रोत्याना हासू व आसू यांच्या हिंदोळ्यावर खिळवून ठेवत, स्त्री हीच सर्वांना सावरणारा स्तंभ असतो, हे सोदाहरण स्पष्ट करताना स्त्रीची तुलना सायकलच्या मागच्या चाकाशी केली. पुढचं चाक स्त्री स्वत: पुरुषाच्या हाती देते, कारण मागच्या चाकावर पूर्ण प्रवास अबलंबून असतो हे ती जाणते. कुटुंबाच्या प्रत्येक ओढग्रस्ती आणि विवंचना केवळ स्त्रीच सावरू शकते. सायकलच्या उदाहरणाद्वारे त्यांनी मागच्या चाकावर असलेल्या अनंत जबाबदाऱ्या सांगताना सायकलला गती देणारी चेन,






ओझे सावरणारे कॅरियर, प्रकाश दाखवणारा डायनामो तसेच आधार देणारे स्टँड, अशा अनंत पातळ्यावरील जबाबदाऱ्या सायकलच्या मागच्या चाकाप्रमाणेच स्त्रीच सांभाळू शकते.

त्या पुढे म्हणाल्या की, 'दुसऱ्याचे भोग पाहिल्यावरच तुम्हाला जाता जाता कळेल की, कितीतरी जणांना तुमची गरज आहे. स्त्रियांनो आपण कधी अभिमानी नसावं, परंतु स्वाभिमानी जरूर असावं. त्याचप्रमाणे आजवर मला आधी भाषण करावं लागलं, त्यानंतरच मदतनिधी दिला गेला, परंतु सिडकोच्या लेकरांनो तुम्ही मात्र जगावेगळे आहात, कारण तुम्ही मला भाषणाच्या आधीच मदतनिधी दिलात'. असेही त्यांनी आवर्जून नमूद केले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सिडकोचे अध्यक्ष **मा. श्री. नकुल पाटील** आपल्या अध्यक्षीय भाषणात सिंधुताईंच्या कार्याचा गौरव करताना म्हणाले की 'आज माणसाला










जगण्यासाठी आदर्श हवा आहे, आज अशा निरपेक्ष वृत्तीने झटणाऱ्या आदर्शांत सिंधुताई सपकाळ यांचे नाव अग्रगण्य आहे. जगात आल्यावर आपली कर्तव्ये काय, यात अपत्य म्हणून, पालक म्हणून, देशाचा नागरिक म्हणून वेगवेगळ्या कर्तव्यांच्या जाणिवा त्यांनी आपल्या कृतीतून जगाला दाखवून दिल्या आहेत'.

याप्रसंगी सिडको कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष **मा.श्री. निलेश तांडेल** व सरचिटणीस **मा.श्री. मिलिंद बागूल** यांनीही आपले शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. सुमारे तीन तास रंगलेल्या या कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच **मा.श्री.नकुल पाटील** यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सिडको महामंडळाच्या मदतनिधीची थैली देऊन सत्कार करण्यात आला, तसेच सिडकोतील विविध संघटनांनी तसेच कर्मचारी व अधिकाऱ्यांनी वैयक्तिक मदत निधीही त्यांच्या संस्थेला बहाल करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन व छत्रपती शिवाजी महाराज आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांस पुष्पहार अर्पण करून, सिडको आर्टीस्ट कंबाईनतर्फे ईशस्तवनाने कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन **श्रीमती अमरजा चव्हाण,** प्रास्ताविक **श्रीमती विजया म्हात्रे** तसेच आभारप्रदर्शन **श्रीमती मिनाक्षी तांडेल** यांनी केले. अत्यंत






उत्स्फूर्त वातावरणात संपन्न झालेल्या या कार्यक्रमाला सिडकोचे विभाग प्रमुख, सिडकोतील विविध संघटनांचे पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## Delegates from UK visit CIDCO

A 15-member delegation from the **UK Railway Industry Association** visited **CIDCO's Nariman Point Office** on **16th March, 2011** to seek information about developmental projects undertaken by CIDCO as well as the Metro Rail project being planned in Navi Mumbai.

**Dr. Mohan Ninawe,** PRO, welcomed the delegates at the CIDCO Office at Nirmal, Nariman Point. Subsequently, Dr. Ninawe gave them an introduction and made a presentation of the Corporate Film. Later, **Shri DLN Murthy,** T.E., made a presentation on CIDCO's projects. After the presentation, a group discussion was held between the delegates and officers from CIDCO, which included **Shri Tanaji Satre,** VC & MD, **Shri M. D. Lele,** CP, **Shri. J. R. Kulkarni,** GM (SEZ & Airport), **Shri Soma Vijaykumar,** ACTE, **Shri B. S. Kulkarni,** SE (TP-III) and **Shri K. K. Warkhedkar,** ACE.

The delegates exchanged notes on their experience in the UK and other countries around the world in implementing such metro projects. They also showed interest in participating in different developmental projects handled by CIDCO.



## 'आर्ट ऑफ लिव्हिंग - योगसाधना प्रशिक्षण' विषयावर मार्गदर्शपर व्याख्यान संपन्न

सिडको भवन येथील सातव्या मजल्यावरील सभागृहात दिनांक १० मार्च, २०११ रोजी **'आर्ट ऑफ लिव्हिंग - योगसाधना प्रशिक्षण'** या विषयावर मार्गदर्शपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या मार्गदर्शनपर व्याख्यानाकरिता योगसाधना मार्गदर्शक **श्री. रत्नेश्वर शेट्टे** आणि प्रशिक्षक **श्री.संदीप महाजन** यांनी आर्ट ऑफ लिव्हिंगचे आपल्या जीवनातील महत्त्व विषद करून पॉवर पाईटद्वारे सादरीकरण केले. या कार्यक्रमाकरिता सिडको कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस **श्री. मिलिंद बागुल,** उपाध्यक्ष **श्री. मोहन भोईर, श्री.विनोद पाटील,** कार्यकारी अभियंता **श्री. डी. एच.परमार,** सहाय्यक कार्मिक अधिकारी **श्री.जितेंद्र परदेशी** उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता **सौ.निलम मुंज** आणि **सौ.सीमा पाटील** यांनी परिश्रम घेतले.



## पनवेल रेल्वे स्थानकासमोरील अरुणोदय चौकाचे उद्‌घाटन

सिडकोतर्फे नुकतेचे पनवेल रेल्वे स्थानकासमोरील अरुणोदय चौकाचे उद्‌घाटन उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक **मा. श्री. तानाजी सत्रे** यांच्या हस्ते **दिनांक २६ मार्च, २०११ रोजी** संपन्न झाले. भव्य अशा अरुणोदय चौकाचे उद्‌घाटन करताना व्यवस्थापकीय संचालक म्हणाले की, 'सिडकोतर्फे नवी मुंबईतील प्रत्येक नोड आपली स्वतःची ओळख अधोरेखित करुन आहे जसे की, खारघर येथील उत्सव व शिल्प हे जसे लॅण्डमार्क म्हणून ओळखले जातात, त्याच प्रमाणे पनवेल येथील अरुणोदय चौकही पनवेलचे लॅण्डमार्क म्हणून लोकांच्या स्मरणात राहील'.

अरुणोदय या शिल्पाच्या संकल्पनेत चैतन्य आणि संस्कृती, सकारात्मक ऊर्जा, पनवेलचा विकास आणि उज्ज्वल भवितव्य प्रकाशात ठळकपणे प्रतिबिंबीत करणारी ज्योत आणि या ज्योतीचे रक्षण करतात ते शिल्पाभोवतीचे स्तंभ अशी आहे. हे आकर्षक शिल्प धारण करणाऱ्या या चौकाच्या विकासासाठी ४५ लक्ष रु. खर्च करण्यात आला. या चौकाचे लॅंडस्केप डिझायनर म्हणून प्रकृती प्रकल्प, मे. साई कुटीर इन्टरप्रायझेस यांनी स्थापत्य कंत्राटदार म्हणून तर उद्यान कंत्राटदार म्हणून मे. साई ॲग्री कल्चर कन्सल्टन्सी यांनी काम पाहिले.

उद्‌घाटन कार्यक्रमप्रसंगी मुख्य नियोजक **श्री. एम.डी.लेले,** अतिरिक्त मुख्य अभियंता (रेल्वे प्रकल्प) **श्री.बी.बी.मेहता,** जनसंपर्क अधिकारी **डॉ. मोहन निनावे,** माजी अधिक्षक अभियंता **श्री. पी. पी.जोशी,** अधिक्षक अभियंता **श्री.किरण फणसे** प्रामुख्याने उपस्थित होते. अरुणोदय चौकाच्या विकास कार्याकरिता प्रभारी अधिक्षक अभियंता **श्री. एस.जी.रोकडे,** सहायक कार्यकारी अभियंता **श्री.अब्दूल करीम, श्री.विनोद बाफणा, श्री.दिलीप दहिवाल** आणि सहायक अभियंता **श्री.नवनील सोनावणे** यांनी काम पाहिले.





# नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के भूखंडाचे वाटप बायोमॅट्रिक पद्धतीने

नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांना / त्यांच्या वारसांना सिडकोकडून साडेबारा टक्के योजनेचे भूखंड वाटपाच्या प्रक्रियेत त्रयस्थ व्यक्तींकडून होणारी फसवणूक टाळण्यासाठी **दिनांक १ मार्च २०११पासून** बायोमॅट्रीक कार्यप्रणालीचा वापर सुरू करण्यात आलेला आहे.

या प्रणालीअंतर्गत प्रकल्पग्रस्तांना देय भूखंडाचे इरादापत्रे व वाटपपत्रे देताना, तसेच भाडेपट्टा करार करताना मूळ भूधारक/त्यांचे वारस यांचे बायोमॅट्रिक प्रणालीद्वारे छायाचित्रे व डाव्या हाताच्या अंगठ्याचे ठसे घेऊनच वितरीत करण्यात येत आहेत. यासाठी सर्व प्रकल्पग्रस्तांना वाटपपत्र घेण्याकरीता कार्यालयात उपस्थित राहणे आवश्यक असून, त्यांच्या वतीने इतरांनी सादर केलेली हक्कसोडपत्रे किंवा अधिकारपत्रे स्वीकारण्यात येणार नाहीत. काही कारणांमुळे प्रकल्पग्रस्त खातेदार / वारसांना एकाच दिवशी उपस्थित राहणे शक्य नसल्यास ते जस-जसे कार्यालयात उपस्थित राहतील त्यावेळी त्यांची छायाचित्रे व अंगठ्याचे ठसे बायोमॅट्रिक प्रणालीद्वारे घेण्यात येऊन, संगणकात जतन करण्यात येतील व सर्वांची छायाचित्रे, ठसे घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर इरादापत्र, वाटपत्र व भाडेपट्टा कराराच्या प्रती देण्यात येतील. भूखंडाचे वाटपपत्र देण्यात आल्यानंतर किमान ७ दिवसांच्या कालावधीनंतरच भाडेपट्टा करार करण्यात येईल.

सिडको प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के योजनेअंतर्गत भूखंड वाटपामध्ये पारदर्शीपणा आणण्यासाठी बायोमॅट्रिक प्रणालीचा वापर सुरू करण्यात आलेला आहे. त्यास सर्व प्रकल्पग्रस्तांनी सहकार्य करावे, असे आवाहन सिडको प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# छत्तीसगड राज्याच्या शिष्टमंडळाची सिडकोस भेट

छत्तीसगड राज्याच्या शिष्टमंडळाने **गुरुवार, दिनांक १० मार्च, २०११ रोजी** सिडकोच्या नवी मुंबईतील मुख्यालयास भेट दिली. शिष्टमंडळात छत्तीसगड राज्यातील दुर्गा महानगरपालिकेचे सभापती **डॉ. देवेंद्र टंडी,** महानगरपालिक आयुक्त **श्री.दिनेशकुमार सिंग,** डोंगरगड महानगरपालिकेचे अध्यक्ष **श्री. धिरज मेश्राम** तसेच शासकीय, निमशासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधी आदींचा समावेश होता. यावेळी मुख्य सामाजिक सेवा अधिकारी **श्रीमती रिमा दीक्षित,** सांख्यिकी अधिकारी **श्रीमती रिटा अब्बी,** अधिक्षक परिवहन अभियंता **श्री.बी.के.हरिया,** सिडकोचे अधिक्षक अभियंता **श्री. किरण फणसे** प्रामुख्याने उपस्थित होते.

प्रारंभी सहाय्यक अभियंता **श्री. फैय्याज खान** यांनी सिडकोच्या कार्यप्रणालीविषयी माहिती दिली. त्यानंतर उपनियोजनकार **श्री. आशितोष निखाडे** यांनी पॉवर पॉईट सादरीकरणाद्वारे सिडकोच्या विविध प्रकल्पांची सद्य:स्थितीबाबतची माहिती दिली. त्याचबरोबर छत्तीसगड राज्याची राजधानी नया रायपूरकरिता सिडकोची विशेष नियोजन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली असल्यामुळे नया रायपूरकरिता सिडकोच्या नियोजनाविषयीची भूमिका त्यांनी खासकरुन जाणून घेतली. तसेच गोल्फ कोर्स, सेंट्रल पार्क, खारघर येथील गृहनिर्माण प्रकल्प, एसटीपी व पायाभूत सुविधा आदी प्रकल्पांना भेट दिली. सिडकोच्या



सर्व प्रकल्पांबाबत तसेच नियोजन व विकास कामांबाबत त्यांनी प्रशंसनीय उद्‌गार व्यक्त केले. सदर शिष्टमंडळाची भेट यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे यांच्यातर्फे राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत आयोजित करण्यात आली होती.

# सिडको वाळूज महानगर निवासी भूखंड आणि घरांची सोडत संपन्न

सिडको वाळूज महानगर-१ मधील निवासी वापराच्या एकूण ०६ भूखंडाची सोडत **दि. २८ मार्च २०११ रोजी** काढण्यात आली. वाळूज महानगर येथील नगर-१ व २ मधील या ०६ निवासी भूखंडासाठी ७ हजार ८९६ अर्ज प्राप्त झाले होते. या सोडतीमध्ये **मंगला कैलास निकम, शरद प्रल्हाद पाटील, प्रियंका अखील खन्ना, कल्पना सतीश गावंडे, आशा पवार व अर्चना जगताप, कैलास दादाजी पगारे** हे भाग्यवान यशस्वी ठरले.

**दि. ४ व ५ मार्च २०११ रोजी** सिडकोने वाळूज महानगर- १ येथे अल्प उत्पन्न गटांकरिता विकसित केलेल्या २२ घरांसाठी सोडती संपन्न झाल्या. अत्यंत शिस्तबद्धरित्या पार पडलेल्या सोडती करिता ८६४२ अर्ज प्राप्त झाले. मुख्य प्रशासक **श्री. पांडुरंग कुलकर्णी** यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या दोन्ही सोडतीकरिता लेखाधिकारी **श्रीमती यू. एस. ठाकूर,** सहा. पणन अधिकारी श्री. दिलीप गणोरे, सहा.




वसाहत अधिकारी श्री.डी .बी दांडगे आणि श्रीमती कल्पना शिंदाडकर यांनी परिश्रम घेतले.

## पदोन्नती व नियुक्ती

सिडको महामंडळात पुढील कर्मचारी व अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे.

### पदोन्नती

◆ **जानेवारी २०११:** **श्री. डी. आर. जोशी** (लेखापाल), **श्री. बी. डी. राठोड** (क्षेत्राधिकारी, भूमापक), **श्री. एस. टी. जोशी** (सुरक्षा सहाय्यक), **श्री. एल. व्ही. मयेकर** (निवडश्रेणी आरेखक), **श्री. डी. आर. रायबोले** (निवडश्रेणी आरेखक).

◆ **फेब्रुवारी २०११:** **श्री. ए. एम. पाटील** (लेखासहाय्यक), **श्री. आर. डी. राठोड** (लेखाधिकारी) **श्री. ए. के. झेले** (लेखाधिकारी)

◆ **मार्च २०११:** **सौ. एम. के. किल्लेकर** (विकास अधिकारी (सामान्य), **श्री. डी. डी. भोईर** (विकास अधिकारी (सामान्य) ◆ **श्री. बी. पी. भोपी, श्री. जे. एस. ठाकूर, श्री. एस. व्ही. म्हात्रे, श्री. एस. बी. कदम, श्री. डी. एस. भोईर** (लेखापाल), **श्री. एम. बी. भुजबळ, श्री. एस. एन. पाटील, श्री. एम. सी. मकसूद व श्री. यु. एस. यादव** (कार्यकारी अभियंता-स्थापत्य), **श्री. एस. एम. कोळी, श्री. के. एम. मुंबईकर, श्री. एस. बी. मोरे, श्री. के. एम. चौधरी, श्री. बी. एम. गाडे, श्री. एम. एस. भोपी व श्री. अे. व्ही. संखे** (सहाय्यक लेखाधिकारी), **सौ. व्ही. एन. मनोरे, सौ. अे. जी. कोठेकर व श्री. आर. बी. सावंत** (उच्चश्रेणी लघुलेखक), **श्री. व्ही. एस. पाठणकर, श्री. जे. बी. भट्ट, श्री. पी. जे. जोसेफ व श्री. व्ही. एम. पवार** (वरिष्ठ आरेखक), **श्री. एच. एस. घरत, श्री. जी. व्ही. पाटील, श्री. पी. जी. कदम व श्री. आर. आर. देवकर** (आरेखक) यांना पदोन्नती देण्यात आली.

### नियुक्ती

◆ **नोव्हेंबर २०१०:** **श्री. उदय तानाजी पगडे** (सफाई कामगार).

◆ **जानेवारी २०११:** **श्री. सचिन त्री. उबाळे** (शिपाई).

◆ **फेब्रुवारी २०११:** **श्री. आनंद अं. ओहोळ** (सफाई कामगार), **कुमारी विनया वि. बनवसे** (लिपिक/टंकलेखक) यांची अनुकंपा तत्वावर नियुक्ती करण्यात आली आहे.

तर **मार्च २०११ मध्ये** **श्री. नाझीमअली रफीकअली काझी** यांची लेखालिपिक या पदावर नियुक्ती करण्यात आली.

पदोन्नतीप्राप्त व नियुक्तीप्राप्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सिडको परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन !



## निरोप समारंभ



**श्री.अरविंद एस. पाटील**



**श्री. दत्तात्रेय एम. करंदीकर**



**श्री. के. एस. हरिहरन**



**श्री. जनार्दन एन. पाटील**

**श्री. अरविंद एस. पाटील** (मुख्य अभियंता व महाव्यवस्थापक (तांत्रिक)), **श्री. दत्तात्रेय एम. करंदीकर** (वरीष्ठ लेखाधिकारी), **श्री. के. एस. हरिहरन** (निवडश्रेणी लघुलेखक), **श्री. गोपीनाथ बी. मोकल** (सहाय्यक लेखाधिकारी), **श्री. व्ही. सि. चुत्तर** (तांत्रिक सहाय्यक-२) व **श्री. जनार्दन एन. पाटील** (तांत्रिक सहाय्यक-२), हे आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर **३१ मार्च, २०११ रोजी** निवृत्त झाले. प्रशासनातर्फे त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला.

या प्रसंगी भविष्य निर्वाह निधी, इतर सामाईक रकमांचे धनादेश, भेटवस्तू, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

या निरोप समारंभा प्रसंगी सिडको कर्मचारी संघटना, बी. सी. एम्प्लॉईज असोसिएशन, इंजिनियर्स असोसिएशन, ऑफिसर्स असोसिएशन व सिडको प्रकल्पग्रस्त कर्मचारी वेल्फेअर असोसिएशन यांनी त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

मुख्य संपादक: **डॉ. दिलीप वाटाणे,** जनसंपर्क अधिकारी, सिडको • मुद्रक व प्रकाशक: **डॉ. मोहन निनावे,** जनसंपर्क अधिकारी, सिडको यांनी सिडको लिमिटेड करीता ही गृहपत्रिका इन-हाऊस स्टुडिओ, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४, महाराष्ट्र-मार्फत छापून सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४, महाराष्ट्र-येथे प्रकाशित केली. (खाजगी वितरणासाठी). या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी सिडको व्यवस्थापन सहमत असेलच असे नाही.